बेंबळा नदी प्रकल्प ता.बाभुळगाव, जि. यवतमाळ या प्रकल्पास चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. सुप्रमा २०१९/२४९०/प्र.क्र.०४/मोप्र-२
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०६ मार्च, २०१९.

पहावे :- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(आ) दिनांक ९ सप्टेंबर, २०१५.
२. शासन शुद्धिपत्रक क्र. संकीर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(आस्था) दिनांक २२ जून, २०१६.
३. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र जा.क्र.१३४०६/विपाविमं/कातां- ३ (१)/बेंबळा/सुप्रमा/२०१९, दि. २६/१२/२०१८.

प्रस्तावना:-

बेंबळा नदी प्रकल्प हा यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यातील खडकसावंगा गावाजवळील बेंबळा नदीवर बांधण्यात आला आहे. सदर प्रकल्प गोदावरी खोऱ्यातील वर्धा उपखोऱ्यातील असून प्रकल्प सर्वसाधारण क्षेत्रातील आहे. या प्रकल्पामुळे यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त नेर, बाभुळगाव, कळंब, राळेगाव व मारेगाव या ५ तालुक्यातील असून सुधारित नियोजनानुसार एकूण ४५,८१८ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. या पैकी ३८८५० हेक्टर क्षेत्र ११३ कि.मी. लांबीच्या उजव्या कालव्याद्वारे व ६९६८ हेक्टर क्षेत्र डेहणी उपसा सिंचन योजनेद्वारे होणार आहे. डेहणी उ.सिं.यो. अंतर्गत सिंचीत होणारे ६९६८ हे. क्षेत्र पूर्णतया ठिबक सिंचनाद्वारे प्रस्तावित आहे.

सदर प्रकल्पास शासनाने मूळ प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र.१०९२/ १०९५/ (१८२/९२)/ WR-I/ ९२, दि. १६.१०.१९९२ अन्वये रू. १९०.३६ कोटी रकमेस, प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. २१०१/८४/(४१८/२००१) /मोप्र-२, दि. ०४/०८/२००४ अन्वये रू. ६२२.४८ कोटी रकमेस, द्वितीय सु.प्र.मा. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर, यांचा महामंडळ निर्णय क्रमांक वि.पा.वि.म./कातां-३/२५६०/(१६/२००६), दि.२९.०८.२००६ अन्वये रू. १२७८.९६ कोटी रकमेस व तृतीय सु.प्र.मा. महामंडळ निर्णय क्रमांक वि.पा.वि.म./कातां-३/य पा मं/बेंबळा/ तृतीय सुप्रमा / (४०/२००९), दि. १४.०९.२००९ अन्वये रु. २१७६.२८ कोटी किंमतीसाठी प्रदान केली आहे. सदर प्रकल्पावर माहे डिसेंबर २०१८ अखेर पर्यंत रु. २५९०.३१ कोटी खर्च झाला आहे. प्रकल्पातील धरणाची घळभरणी २००७ मध्ये पूर्ण करण्यात आली आहे. ऑक्टोबर २०१८ अखेरपर्यंत जास्तीत जास्त २५६.३२

दलघमी पाणी साठा आहे. आता रु. ३५१७.८३ कोटी (दरसूची २०१३-१४) इतक्या किंमतीचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी संदर्भ ३ अन्वये सादर केला आहे.

संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयानुसार विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार संबंधित सिंचन विकास महामंडळास प्रदान करण्यात आले आहेत. तथापि सदर शासन निर्णयातील परिच्छेद ४ नुसार नियामक मंडळाने सु.प्र.मा. प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करावा असा निर्णय घेतल्यास सु.प्र.मा. प्रस्ताव मा.मंत्रीमंडळास सादर करणेची तरतूद आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर, यांच्या दि.६.६.२०१८ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे बैठकीत चतुर्थ सु.प्र.मा. देणेचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करावा असा ठराव पारित झाला असल्याने सदर प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या दि.५.३.२०१९ च्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला होता.

मा.मंत्रीमंडळाने बांधकामाची सद्य:स्थिती, बेंबळा प्रकल्पाचे फेरनियोजन किंमतवाढीची कारणमीमांसा इ. बाबींचा परामर्श घेऊन बेंबळा प्रकल्पाच्या जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग दरसुची २०१३-१४ वर आधारित रु. ३५१७.८३ कोटी किंमतीच्या चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय -:

बेंबळा नदी प्रकल्पाच्या (जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१३-१४ च्या दरसूचीवर आधारित) रु. ३५१७.८३ कोटी किमतीच्या सुधारित प्रकल्प अहवालास (प्रत्यक्ष कामासाठी एकूण रू. ३३२७.८४ कोटी व अनुषंगिक खर्च रू. १८९.९९ कोटी) खालील अटींच्या अधीन राहून चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रकल्पाच्या उपशिर्षनिहाय व घटकनिहाय तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट “अ” व “ब” मध्ये सोबत जोडला आहे.

१) राज्यस्तरिय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील परिच्छेद क्र.२६ व २७ अंतर्गत सर्व मुद्यांचे अनुपालन करावे.

२) उपलब्ध निधीचे Thin Spreading टाळणेचे दृष्टीने प्रकल्प घटकांच्या बांधकामावरील गुंतवणुकीचा प्राधान्य क्रम निश्चित करुन त्यानुसारच कामे करावीत.

३) लाच लुचपत विभागामार्फत तसेच विशेष चौकशी समितीच्या अनुषंगाने चालू किंवा प्रस्तावित चौकश्या व त्यानुषंगाने करावयाच्या कार्यवाहीवर या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या निर्णयामुळे कोणतीही बाधा पोहचणार नाही.

४) प्रकल्प कार्यान्वित करतांना काही अनियमितता निदर्शनास आल्यास त्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय अधिका-यांवर राहील.

५) पूर्ण झालेल्या घटक कामाचे घटक निहाय समाप्ती अहवाल तयार करुन सदर कामे तात्काळ सिंचन व्यवस्थापन यंत्रणेकडे हस्तांतरित करावीत.

६) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

७) प्रकल्पावर ज्या ठिकाणी वितरिका/लघुकालवे यांची कामे हाती घेतलेली नाहीत, अशा ठिकाणी बंद नलिकेव्दारे सिंचन करण्याचा पर्याय वापरावा.

८) बेंबळा प्रकल्पांतर्गत असलेल्या सर्व उपसा सिंचन योजनांतर्गतच्या पंपाच्या परिचालनासाठी होणारा आवर्ती खर्च कमी करण्याच्या दृष्टीने तसेच योजनेच्या शाश्वत स्वरुपातील परिचालनासाठी सौर उर्जेचा जास्तीत जास्त वापर करावा. याकरिता केंद्र शासनाच्या उर्जा मंत्रालयांतर्गत असलेल्या EESL (Energy Efficeincy Service Limited) या सार्वजनिक उपक्रमाचे तसेच राज्य शासनाच्या अधिपत्याखालील महाउर्जा (MEDA- Maharashtra Energy Development Agency) यांचे सहकार्य घेण्यात यावे. सौर उर्जा वापराच्या अनुषंगाने काही यंत्रणा उभारणी करणे आवश्यक असल्यास त्याकरीता येणा-या खर्चाची तरतूद प्रकल्पाच्या पुढील सुधारित प्रकल्प अहवालात करून त्यास प्रचलित कार्यपद्धतीनूसार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त करून घ्यावी. याकरीता मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.

या प्रकल्पाच्या कामावरील खर्च मागणी क्र. आय-५, मुख्य लेखाशीर्ष ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना कर्जे, योजनांतर्गत(०२)(०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (मोठे प्रकल्प) (४७०१ एच ६६५) या खाली खर्ची घालावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय दिनांक ५ मार्च, २०१९ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळाचे निर्णयाचे अनुषंगाने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ६०/२०१९ व्यय-१२ अन्वये सहमती दिल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

या योजनेस प्रदान करण्यात आलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची नोंद मोठे प्रकल्प-२ कार्यासनाच्या प्रशासकीय मान्यता नोंदवहीमध्ये सन २०१८-१९ *अ.क्र.५* वर घेण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०६१७०५३४८७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Tulshiram Kedare

Digitally signed by Pandurang Tulshiram Kedare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e594e26c6ca4bffd8b1d4e20a155e473c21b0dd40f25c25bd478079005896501, cn=Pandurang Tulshiram Kedare
Date: 2019.03.06 17:08:33 +05'30'

(पां. तु. केदारे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : परिशिष्ट :- अ व ब

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) मा.विरोधीपक्षनेते,विधानसभा/विधानपरिषद,विधानमंडळ,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई
५) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
६) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
७) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
८) महासंचालक, संकल्पचित्र, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व धरण सुरक्षा, नाशिक
९) मुख्य अभियंता ,जलसंपदा विभाग, अमरावती.
१०) आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) अधिक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प मंडळ, यवतमाळ
१२) कार्यकारी अभियंता, बेंबळा पाटबंधारे विभाग, यवतमाळ
१३) कार्यकारी अभियंता, बेंबळा प्रकल्प विभाग,यवतमाळ
१४) जिल्हाधिकारी, यवतमाळ
१५) उप सचिव (निवसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मंबई-३२.
१६) अर्थ शाखा १ व २, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मंबई-३२.
१७) निवड नस्ती- मोप्र-२.

परिशिष्ट-अ

शासन निर्णय क्र. सुप्रमा २०१९/२४९०/प्र.क्र.०४/२०१९/मोप्र-२, दिनांक ०६ मार्च, २०१९ चे सहपत्र बेंबळा पाटबंधारे प्रकल्प, ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ या प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकातील उपशीर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा

अ.क्र.	विवरण	फेरनियोजनाप्रमाणे बेंबळा प्रकल्पाची सुधारित किंमत (रु. कोटी)
१.	ए -प्राथमिक	९.७३
२.	बी -भूसंपादन	११४७.६२
३.	सी -कामे	१६४.१८
४.	डी -विमोचक	३६.८३
५.	इ - फॉल	२.२३
६.	एफ - आरएचटी कामे	११८.१५
७.	जी - पूल	४०.००
८.	एच - एस्केप	४.५९
९.	के -इमारती	२१.९४
१०.	एल - मातीकाम	१४१.०८
११.	अस्तरीकरण	४७३.५३
१२.	एम-वृक्षारोपण	०.५६
१३.	ओ-संकिर्ण	२१.५२
१४.	पी - देखभाल-दुरुस्ती	१०.०४
१५.	क्यु- हत्यारे व सयंत्रे	१.४१
१६.	आर- दळणवळण	१.९२
१७.	यु- वितरीका	३९४.६३
१८.	व्ही- पाटचा-या (वॉटर कोर्सेस)	२३७.७५
१९.	डब्ल्यू- ड्रेनेज	३.००
२०.	एक्स - पर्यावरण	१.०६
२१.	डेहणी उपसा सिंचन योजना	४९६.०७
	एकूण	**३३२७.८४**
२२.	अनुषंगीक खर्च	१८९.९९
	एकूण	**३५१७.८३**

परिशिष्ट-ब

शासन निर्णय क्र. सुप्रमा २०१९/२४९०/प्र.क्र.०४/२०१९/मोप्र-२, दिनांक ०६ मार्च, २०१९ चे सहपत्र बेंबळा पाटबंधारे प्रकल्प, ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ या प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकातील घटकनिहाय तपशील

अ.क्र.	**कामे**	**मंजुर तृतीय सुप्रमा मधील तरतूद (दरसूची २००८-०९)**	**प्रस्तावित चतुर्थ सुप्रमा मधील तरतूद (दरसूची २०१३-१४)**
१.	धरण	५८९.२२	११०६.६९
२.	कालवा व वितरिका	९८८.९१	१७२५.०७
३.	डेहणी उ.सिं.यो.	४११.८०	४९६.०८
४.	अनुषंगिक खर्च	१८६.३५	१८९.९९
	एकूण	**२१७६.२८**	**३५१७.८३**